सं.फौ.ख.क्र.३३६/२०२४
सरकार वि संजय
नि.१२ खाली

MHNG100006942024

## न्यायनिर्णय
## (घोषित दि.०४ एप्रिल, २०२६)

अभिलेखावर आलेला पुरावा व दोन्ही बाजुंनी केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने खालील मुद्दे माझेसमक्ष विचारार्थ उपस्थित होतात. मी माझा निष्कर्ष कारणासह त्यावर खालीलप्रमाणे नोंदवितो.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.०५/०४/२०२४ रोजी १६.१० ते १६.५० वाजताचे सुमारास मौजा शडेश्वर कॉलोनी उमरेड, ता.उमरेड येथे आरोपी संजय वामनराव लांबट यांच्या ताब्यामध्ये देशी दारूच्या १२ निप्पा अवैधरित्या विनापरवाना मिळून आल्या असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नाही |
| २ | आदेश काय? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

२) अभियोग पक्षाने प्रस्तुतच्या प्रकरणात एकुण एकाच साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे. साक्षीदार क्र.०१ किशोर विठ्ठल किन्नाके यांची साक्ष नि. क्र. १२ खाली नोंदविली. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपी विरूध्द पुरावा न मिळुन आल्यामुळे त्याच्या विरूध्द फौ.प्र.सं.चे कलम ३१३ प्रमाणे बयान नोंदविण्यात आले नाही.

<u>मुद्दा क्र. ०१ करिता:-</u>

३) साक्षीदार क्र. ०१ किशोर विठ्ठल किन्नाके यांच्या पुराव्यात ते असे कथन करतात की, पोलीसांनी त्यांना पंचनाम्यासाठी समन्सपत्र दिले नव्हते तसेच त्यांचेसमक्ष कोणतीही कारवाई केली नाही. त्यांना दाखविण्यात आलेल्या समन्सवर त्यांची सही आहे त्यातील मजकुर त्यांना माहित नाही असे ते सांगतात. तसेच त्यांना दाखविण्यात आलेल्या घटनास्थळ पंचनाम्यावर त्यांची सही आहे परंतू त्यातील मजकुर मात्र ते नाकारतात. सदर साक्षीदार यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, असे दिसते की, सदर साक्षीदाराचा साक्षपुरावा सरकार पक्षाला सहाय्य करत नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना उत्तरसुचक प्रश्नही विचारले परंतू त्यातूनही उपयुक्त असे काहीही अभिलेख पटलावर आले नाही. आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेली देशी दारू १२ निपा ही दारूच होती किंवा कसे हे शाबीत होण्याकरीता स्वतंत्र साक्षीदारांनी सरकार पक्षाचे समर्थन करणे जरूरीचे वाटते.

४) आरोपीच्या ताब्यात देशी दारू १२ निपा दारू मिळुन आली ही बाब शाबीत होण्याकरीता स्वतंत्र साक्षीदारांनी सरकार पक्षाचे समर्थन करणे जरूरीचे वाटते.

५) अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवुनही इतर साक्षीदार तपासले नाही. जरी अभिलेखावर रासायनिक परिक्षणाचा अहवाल दाखल केलेला असला तरी घटनास्थळावरून सी.ए. नमुन्यासाठी सॅम्पल प्रयोगशाळेमध्ये ज्यांनी नेले त्यांची साक्ष अभियोगपक्षाने पुरेशी संधी देउनही नोंदविली नाही. तसेच घटनस्थळ पंचनामा सुध्दा सिध्द झालेला नाही. त्यामुळे जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा दारू होती अगर कसे असे म्हणता येणार नाही. परिणामी, मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, अभियोग पक्ष हे आरोपीच्या विरूध्दचे आरोप नि:संशयपणे सिध्द करण्यास विफल ठरले. सबब मी विचारार्थ प्रश्न क्र.०१ ला नकारार्थी उत्तर देतो आणि मी विचारार्थ प्रश्न क्र. ०२ ला उत्तर म्हणुन खालील आदेश पारीत करतो.

**सं.फौ.ख.क्र.३३६/२०२४**
**सरकार वि संजय**
**नि.१२ खाली**

## आदेश

**१.** आरोपी **संजय वामनराव लांबट** याला महाराष्ट्र दारू प्रतिबंध अधिनियम कलम ६५(ई) या दंडनीय अपराधातुन फौजदारी प्रक्रीया संहीता कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे जामीनकदबे व जातमुचलके रद्द करण्यात येतात.

**३.** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ चे पुर्ततेसाठी आरोपीने रक्कम रूपये १५,०००/– चा वैयक्तीक जातमुचकला व जामीन मुचकला सादर करावा.

**४.** सदर प्रकरणतील जप्त मुद्देमाल देशी दारू १२ निपा दारू ही अपील कालावधी संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, उमरेड यांच्याकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय न्यायालयीन वेळेत व खुल्या कक्षात अग्रघोषित करण्यात आला.)

RAVI SATYABHAN MANKAR
order
Digitally signed by RAVI SATYABHAN MANKAR
Date: 2026.04.04 18:11:44 +0530

उमरेड
दि.०४–०४–२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड

MHNG100006942024



सं.फौ.ख.क्र.३३६/२०२४
सरकार वि संजय
नि.१२ खाली

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order. | | |
| Name of Court | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Umred, Dist.Nagpur |
| Presiding Officer | :- | R. S. Mankar |
| Judgment uploaded by | :- | S.B.Ghardinkar(StenographerL.G) |
| Date of Judgment | :- | 03.01.2025 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 03.01.2025 |